जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या शैक्षणिक दर्जामध्ये सुधारणा करण्याकरिता अभ्यासगट गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -२०२१/ प्र.क्र. ५३३/आस्था-१४
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४००००१
दिनांक :- १७ डिसेंबर, २०२१

वाचा:- शासन निर्णय समक्रमांक दिनांक १४.९.२०२१.

प्रस्तावना :-

दिल्ली सरकाराच्या दिल्ली निगम अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये काळानुरुप शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी मोठया प्रमाणावर बदल व सुधारणा झालेल्या आहेत. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्याकरिता वापरण्यात येणारे तंत्रज्ञान, विद्यार्थ्यांकरिता व शिक्षकांकरिता असणाऱ्या सुविधा, विद्यार्थ्यांचे आचार-विचार व शिस्त तसेच शिक्षकांच्या शिकविण्याची कार्यपध्दती या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करण्याकरिता तज्ञ मंडळीचा अभ्यासगट दिनांक १४.९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आला होता. सदर अभ्यासगटामध्ये काही तज्ञ मंडळींचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

दिल्ली सरकाराच्या दिल्ली निगम अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्याकरिता वापरण्यात येणारे तंत्रज्ञान, विद्यार्थ्यांकरिता व शिक्षकांकरिता असणाऱ्या सुविधा, विद्यार्थ्यांचे आचार-विचार व शिस्त तसेच शिक्षकांच्या शिकविण्याची कार्यपध्दती या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करण्याकरिता तज्ञ मंडळीचा अभ्यासगटाची पुनर्रचना पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे. सदर अभ्यासगटाचे पथकप्रमुख श्री. सुनिल चव्हाण, जिल्हाधिकारी, औरंगाबाद हे असतील.

अ.क्र.	नांव	पदनाम
१	श्री. सुनिल चव्हाण	जिल्हाधिकारी, औरंगाबाद, प्रथम प्रमुख.

२	श्री.निलेश गटने	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद
३	श्री. संजयसिंह चव्हाण	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर.
४	डॉ. बी. बी. चव्हाण	उप संचालक (शिक्षण), नाशिक
५	डॉ. गणपती कमलाकर	गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कागल, जि.कोल्हापूर
६	श्री.पोपट श्रीराम काळे	गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती राहाता, जि.अहमदनगर
७	श्री.आर.एस. शेख	सेवानिवृत्त विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ सह.संस्था.
८	श्री.सुनिल सुरेशराव चिपाटे	मुख्याध्यापक, जि.प.प्राथमिक. शाळा वडगाव कोण्हाटी, जि.औरंगाबाद.
९	श्री.संदिप गुंड	उप अध्यापक, जिल्हा परिषद, ठाणे. सध्या कार्यरत समन्वयक डिजिटल शाळा अभियान, जिल्हा अहमदनगर / कोल्हापूर.
१०	श्री.काशिनाथ रामदास पाटील	सहशिक्षक, माणिकराव पालोदकर विद्यालय, फर्दापूर, ता.सोयगाव, जिल्हा औरंगाबाद.
११	श्री.जगन सुरसे	सहशिक्षक, जिल्हा परिषद शाळा, वरुर, ता.सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

सदर अभ्यासगटाने दिल्ली सरकाराच्या दिल्ली निगम अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्याकरिता वापरण्यात येणारे तंत्रज्ञान, विद्यार्थ्यांकरिता व शिक्षकांकरिता असणाऱ्या सुविधा, विद्यार्थ्यांचे आचार-विचार व शिस्त तसेच शिक्षकांच्या शिकविण्याची कार्यपध्दती या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल शासनास दोन महिन्याच्या आत सादर करावा.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने उपरोक्त अभ्यासगटातील सदस्यांचा प्रवासभत्ता आणि इतर सर्व भत्ते जिल्हा परिषद, औरंगाबाद व जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी स्वनिधीतून भागविण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११२१६१८०८२५९४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Suryakant Hanje

Digitally signed by Sunil Suryakant Hanje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue & Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b52de42797ba0b88d4615daa9566ad8fa49d50637950208576d69ab9dba313a9, serialNumber=345a2816550fe595955b31526c8e1a31863f6f9dc898d91e4543436be8b73fda, cn=Sunil Suryakant Hanje
Date: 2021.12.17 13:21:08 +05'30'

(सुनिल हंजे)
अवर सचिव ग्रामविकास विभाग

प्रति,

१) मा राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधान परिषद / विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे, जालना, गोंदिया, यवतमाळ, वर्धा.
११) उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
१२) ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने
१३) निवड नस्ती-आस्था.१४.
